रे.दि.मु. ५५/२०१५

## निशाणी क्र. ८६ वरील आदेश

वादी तर्फे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ हे मयत झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट सेट असाईड करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ डॉ. राजेंद्र संभाजी सोनुने हे दिनांक ०३/०७/२०२० रोजी मयत झाले आहे व मृत्युचा उतारा नि.क्र. ६३ लगत दाखल केलेला आहे. मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. वादी हे वयोवृध्द असल्याने व कोरोना कालावधीमुळे मयत प्रतिवादीचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यास विलंब झाला. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेता आले नाही. वादीकडुन कोणताही हेतूपुरस्सर विलंब झालेला नाही. मयताचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचीत व आवश्यक आहे. मयताचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करण्यात येवून त्याचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळणेकामी वादींनी अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे/मयताच्या वारसांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादीने अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. अर्ज हा मुदतीत दिलेला नाही. सदर अर्जावर वादी यांची सही नाही. वादीने सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतूने दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादींनी सदरचा दावा, हा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचा ताबा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी त्यांचे विरुध्दचा अबेटमेंट चा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषांवर होण्याकरिता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. तसेच, केवळ तांत्रीक बाबीमुळे अर्ज नामंजुर करणे योग्य होणार नाही. त्याकरिता वादीवर खर्च लादून अर्ज मंजूर करणे योग्य होईल.सबब, खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज नि. ८६ ॲबेटचा आदेश रद्द होवुन वादीवर खर्च रुपये २००/- लादून मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरचा खर्च प्रतिवादी यांना द्यावा.

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL
Date: 2022.01.05 17:21:49 +0530

उमरखेड (पी.एस. पाटील)

दिनांक-०५/०१/२०२३ दिवाणी न्यायाधी क. स्तर, उमरखेड

रे.दि.मु. ५५/२०१५

<u>प्रमाणपत्र</u>

याव्दारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकुर मूळ आदेशाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | |
|---|---|
| आदेशाचा दिनांकः | ०५/०१/२०२३ |
| आदेश स्वाक्षांकित दिनांकः | ०५/०१/२०२३ |
| लघुलेखकाचे नावः | य.वि.पोरकुटे |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांकः | ०६/०१/२०२३ |